कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे अंतर्गतचा सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन उपविभाग, शिंदखेडा हा उपविभाग कार्यकारी अभियंता, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे यांच्याकडे कामांसह वर्ग करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: आढावा-२०१८/प्र.क्र.५२/२०१८/आस्था.(पुनर्रचना)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०६ जून, २०१९

वाचा:- १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि. ०८.०३.१९८४
२. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-१००२/३३५/२००२/आ.(प्रशि), दि. ०६.०२.२००३
३. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-२०१८/प्र.क्र.१०८/२०१८/आ(प्रशि), दि. २८.०६.२०१८
४. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-२०१८/प्र.क्र.१०८/२०१८/आ(प्रशि), दि. २७.०९.२०१८

प्रस्तावना:-

सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेच्या कामांसाठी मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक अधिनस्त अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर अंतर्गतचे कार्यकारी अभियंता, कडवा कालवा विभाग, नाशिक हे विभागीय कार्यालय त्याअंतर्गतच्या ४ उपविभागीय कार्यालयांतर्गतच्या मंजूर पदांसह तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव या कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच सदर शासन निर्णयात अंशत: बदल करून संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये नांदुर मधमेश्वर प्रकल्प विभाग अंतर्गतचे मुकणे धरण उपविभाग क्र. २, नाशिक या उपविभागाचे स्थलांतरण धुळे येथे, तसेच पुणेगांव कालवा उपविभाग, ऊनंदानगर हे कार्यालय गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गतच्या नांदुर मधमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक अंतर्गत वर्ग करण्यात आले आहे.

बळीराजा संजिवनी योजनेंतर्गत सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन योजनेचा समावेश असल्याने सदर कामे केंद्र शासनाने नियत केलेल्या ५ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेची कामे जलद गतीने सुरू होण्यासाठी व शासकीय कामकाज सुरळीत होण्यासाठी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे अंतर्गतचा सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन उपविभाग, शिंदखेडा हा उपविभाग कार्यकारी अभियंता, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे अंतर्गत आस्थापना व कामांसह वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे या विभागीय कार्यालयांतर्गत कार्यरत असणारा सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन उपविभाग, शिंदखेडा हा उपविभाग सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या कामांसाठी त्याअंतर्गतच्या कामांसह व मंजूर पदांसह कार्यकारी अभियंता, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे यांच्याकडे वर्ग करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सुलवाडे जामफळ उपसा सिंचन उपविभाग, शिंदखेडा या उपविभागीय कार्यालयाच्या विभागीय नियंत्रणात बदल करण्यात येत असून, इतर कोणताही बदल करण्यात येत नाही. तसेच सदर उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय शिंदखेडा येथेच राहील.

३. उपविभागीय कार्यालयाच्या विभागीय नियंत्रणात बदल होत असल्याने, या कार्यालयासाठी वित्त विभाग, शासन निर्णय क्र. ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि. ०८.०३.१९८४ मधील तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांना नियंत्रक अधिकारी व कार्यकारी अभियंता, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद उपविभागीय कार्यालयातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व वेतनेतर प्रयोजनावरील खर्च हा संबंधित मंडळ कार्यालयांच्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६०६१७२६३६४३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2019.06.06 17:33:17 +05'30'

(सु.गं.गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४) मा. मंत्री (खारजमीन) यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा.
७) मा.विधानपरिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
८) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (ज.सं.प्र. व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.
१३) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/ नागपूर.
१४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
१६) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळ कार्यालये.
१७) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
१८) सह सचिव (प्रशा.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.

२१) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे.
२२) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२३) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.
२४) उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) आंतरवित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) अधीक्षक अभियंता, ई- प्रशासन मंडळ, पुणे (मंडळ कार्यालयांतर्गत झालेल्या बदलाची आवश्यक नोंद घेण्यास्तव अग्रेषित.)
२७) कार्यकारी अभियंता, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे.
२८) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे.
२९) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०) कार्यासन आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ.